ग्राम पंचायतींनी ग्रामसभा व मासिक सभा
वेळेवर व नियमितपणे घेण्याबाबत, पंचायत
राज समितीने केलेल्या शिफारशीबाबत.

------

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : पीआरसी-१०७६/२४११/तेवीस,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२, दिनांक: 10 जानेवारी १९७७

परिपत्रक

पंचायत राज समितीने, १९७५-७६ च्या पाचव्या अहवालात, शिफारस क्रमांक २.४१ व ८.३१ मध्ये ग्रामसभा व मासिक सभा घेण्याबद्दल, जे अभिप्राय व्यक्त केलेले आहेत ते खालील प्रमाणे आहेत :-

शिफारस क्रमांक : २.४१ : वाशिम, मालेगाव, बार्शीटाकळी पंचायत समिती : - वर्षातून दोन वेळा ग्रामसभा घेण्याच्या बंधनाचे पालन बहुतांशी झालेले नाही. गणपूर्ति नसणे ही नेहमीचीच अवस्था दिसते. मासिक सभासुध्दा नियमित होत नाहीत. संबंधित सरपंचांना ह्यापुढे मासिक सभा नियमाप्रमाणे न घेतल्यास त्यांची प्रकरणे जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतील याबद्दल ताकीद देण्यात आली आहे.

ग्रामसभांबद्दल जी चिंताजनक अवस्था आहे त्यासंबंधी सर्वसाधारणतः पुढील कारणे नमूद करण्यात आली आहेत :-

१) गावकऱ्यांना ग्रामसभांचे महत्वच कळलेले नाही. त्यांना या बाबतीत आस्था व रस नाही व ते सभेला यावयास नाखूष असतात.
२) गणपूर्ती होणे जवळ जवळ अशक्य असते. जे काही थोडेबहुत लोक येतात ते शेवटपर्यंत थांबत नाही. उपस्थिती नोंदवहीवर लोक सह्याही करीत नाहीत.
३) निधीच्या अभावी लोकांच्या अपेक्षेप्रमाणे कामे होत नाहीत व म्हणून लोक ग्रामसभेला महत्व देत नाहीत.

ग्रामीण विभागातील जनता बहुतांशी अज्ञानी असते. तेव्हा ग्रामसभांच्या बाबतीत त्यांची उदासिनता समजण्यासारखी आहे. परंतु त्यामुळे या बाबतीत कांही विशेष उपाययोजना न करणे हे सुध्दा इष्ट नाही. या बाबतीत लोकांत नानाविध प्रकारांनी प्रचार केला पाहिजे. त्यांना पटेल अशा पध्दतीने ग्रामसभांचे महत्व व उपयुक्तता समजावली पाहिजे. ग्रामसभा या ज्या काळात शेतकऱ्यांना विशेष काम नसते अशा काळात व त्यांच्या सोयीस्कर वेळी भरविल्या जाव्यात. याच अहवालात समितीने या बाबतीत अन्य काही शिफारशी केल्या आहेत. (उदा. ग्रामीण रेडिओ कार्यक्रमाव्दारा प्रचार, अनुबोधक लघुपट, पोस्टर्स लावणे इत्यादी) त्यांचाही विचार व्हावा.

शिफारस क्रमांक ८.३१ :- ग्रामसभा - मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ७ अन्वये ग्राम पंचायतीने वित्तीय वर्षात कमीत कमी २ ग्रामसभा घेणे आवश्यक आहे.

====२

OFFICE OF THE COLLECTOR
RATNAGIRI
Date 18 JAN 1977

पहिली ग्रामसभा वित्तीय वर्ष सुरु झाल्यापासून २ महिन्याचे आंत व दुसरी नोव्हेंबर महिन्यात घ्यावयाची असते. ग्रामसभा या नियमानुसार विहित केल्याप्रमाणे घेण्यात येत नाही. इतकेच नव्हे तर सभेला आवश्यक त्या वढया संख्येने लोक उपस्थित नसतात. परंतु कोरम अभावी सभा तहकूब करुन दुसरी सभा घेतली जात नाही. अशा प्रकारे कायद्याचे उल्लंघन साधारणतः बहुतांश ग्रामपंचायतीव्दारे होते. ग्रामसभेची कल्पना त्या ग्रामपंचायतीच्या कारभारात जास्तीत जास्त लोकांनी भाग घेऊन लोकशाहीच्या कारभारात भाग घ्यावा. आपल्या गावाची पर्यायाने स्वतःचीच व देशाची नियोजनात व कारभारात स्थान प्राप्त व्हावी ही आहे. याचे महत्व ग्रामीण जनतेला कळलेले दिसत नाही.

कायद्यानुसार बैठकी घेतल्या नाहीत तर सरपंच उर्वरित काळासाठी त्या पदावर राहण्यास अपात्र ठरतो. याची जाणीव असूनही सरपंच वा जिल्हा परिषदेचे अधिकारी व पदाधिकारी त्या बाबतीत हलगर्जीपणा करतात असे म्हणावे लागते. तेव्हा ग्रामसभेला जास्तीत जास्त लोकांची उपस्थिती राहण्याकरिता अधिकारी, पदाधिकारी, सरपंच व सदस्य यांनी जातीने अशा सभांना उपस्थित राहण्याचा कार्यक्रम आखावा व या करितां आपआपसांत गट स्थापून ग्रामसभेच्या जास्तीत जास्त बैठकींना उपस्थित राहावे या उपरही जर ग्रामसभा कायदा व नियमानुसार भरविण्यात आल्या नाहीत तर संबंधितांविरुध्द कारवाई करावी असे समितीस वाटते.

पंचायत राज समितीच्या उपरोक्त शिफारस क्रमांक २.४१ वर शासनाने विचार करुन असा निर्णय घेतला आहे की, ग्रामसभा वेळेवर व नियमित घेण्यासाठी, जिल्हा परिषदांचे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पोस्टर्स लावून प्रचार करावा. तरी या बाबत, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्वरीत कारवाई करावी.

पंचायत राज समितीने केलेल्या शिफारस क्रमांक ८.३१ बाबतीत असे स्पष्ट करण्यात येते की, शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्रमांक : व्हीपीएम-१३७५/३५५५/२३, दिनांक १०-२-७६ अन्वये ग्रामसभा नियमितपणे व वेळेवर घेण्याबाबत आदेश दिले असेल न असले तरी सुध्दा ती घेण्यात येत नाही. याबद्दल शासनास दिलगिरी वाटते. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना असे आदेश देण्यात येत आहे की, यापुढे ग्रामसभा व मासिक सभा नियमितपणे व वेळेवर घेण्यात येतील याबद्दल दक्षता घ्यावी व ज्या ग्रामपंचायती ग्रामसभा व मासिक सभा नियमितपणे व वेळेवर घेत नाही, त्या बद्दल संबंधित सरपंचाविरुध्द ग्रामसेवकाविरुध्द कडक कारवाई करावी. शासनाच्या असे सुध्दा नजरेस आलेले आहे की, मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी शासनास पाठविलेल्या अहवालात ग्रामसभा व मासिक सभा वेळोवेळी घेण्याबद्दल गट विकास अधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. व त्या पलीकडे कोणतीही कारवाई केलेली आढळत नाही. यापुढे शासनास असे अहवाल सादर केल्यास त्यांची गंभीर दखल घेण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

(श्री. बिं. जोशी)
कार्यासन अधिकारी.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,

====३